# माझा स्पेनचा अभ्यास दौरा : हेमंत शहा




गेल्या वर्षी कुटुंबासोबत पश्चिम युरोपला जाऊन आलो. त्या आठवणी अजून ताज्याच असताना आमच्या सी. ए. इन्स्टीस्टूटच्या पुणे शाखेचा स्पेनचा दौरा आयोजित करण्याचा मेसेज आला. पश्चिम युरोपनंतर आता उर्वरित युरोप पहायची इच्छाही होतीच. त्याचप्रमाणे या दौऱ्यात पर्यटनाबरोबर अभ्यास पण होणार आहे. तसेच महाराष्टातील हजारो सीएंना गुरूस्थानी असणारे व आमच्या इन्स्टीस्टूटचे सदस्य असणारे श्री झावरे सर यांचे मार्गदर्शन मिळत असल्यामुळे मुले व पत्नी बरोबर येऊ शकत नसतानाही मी स्पेनच्या अभ्यास दौऱ्यात जायचे ठरविले. या प्रवासात आमच्या सोबत पुण्यातील ४५ सी. ए. व त्यांचे कुटूंबीय होते.

बार्सिलोना येथे आमची पाहिली आंतरराष्टीय परिषद झाली. मॉन्टसेरात पर्वतावरील प्राचीन ख्रिस्ती गुरूकुल आणि मठ यांना भेट दिली. मॉन्टेसरातवरील रेल्वे थक्क करणारी आहे आणि युरोपिय अभियांत्रिकीच्या प्राविण्याचे प्रतिक आहे. तेथील कॅथडेलमधील लहान मुलांचा संगीताचा कार्यक्रम अप्रतिम व सुंदर होता. तेथून आम्ही वॅलेन्सियाला जायला निघालो. हा प्रवास जवळजवळ ४०० किलोमीटरचा होता. पण वाटेत संगमनेरचे सी. ए. एस. जी. देशमुख सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वामी विवेकानंदावर व्याख्याने दिली. अनेक सभासदांनी त्यांच्या थक्क करणाऱ्या यशस्वी जीवनातील अनुभव कथन केले. या प्रवासात पुणे शाखेचे पदाधिकारी व इतर तरूण, तरूणी सी. ए. बरोबरचा संवाद पण नव्या क्षितिजांची ओळख करून देणारा उपयुक्त असा संवाद होता. त्यामुळे रस्ता कसा मागे सरकत गेला कळलेच नाही. स्पेन मधील ते दिवस आनंदपर्वच होते.

युरोपच्या हॉटेल्स् मधील ब्रेकफास्ट अप्रतिम असतो. पण कोठेही गेले तरी भारतीय भोजन केल्याशिवाय पोट भरणार नाही त्यामुळे पुष्कळदा थेट भारतीय उपहारगृह गाठले आणि भोजनाचा आस्वाद घेतला. वॅलेन्सियामधील अप्रतिम दृश्य म्हणजे तेथील पाण्याचे कारंजे. तसा समुद्रकिनाराही अप्रतिमच होता. पाण्याचे मोठे रंगीत कारंजे म्हणजे एक नवलाईच होती. ते दृश्य थक्क करून टाकणारे होते. येथे फिरत असताना आम्ही येथील सध्याच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्याचा प्रयत्न करत होतो. चर्चेअंती असे जाणवले की स्पेन व युरोपमधील मंदीची कारणे म्हणजे बँकांनी केलेला अवाजवी कर्ज पुरवठा, त्यातून उभी राहिलेली अनावश्यक, अवाढव्य बांधकामे (गृहसंकुले, विमानतळे इत्यादी). तेथील एका व्यक्तीच्या मते बेकारी भत्ता सुध्दा अनुत्पादकता वाढविण्यास काही अंशी कारणीभूत आहे. भारतात पण मनरेगा सारख्या चांगल्या योजनेचा अयोग्य अंमलबजावणीमुळे काही क्षेत्रात उत्पादकता कमी झालेली दिसून येत आहे.

आत फक्त माद्रिद पाहणे बाकी होते. वॅलेन्सियानंतर माद्रीदला गेलो. तिथे आमची दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली. तिथेसुध्दा युरोपची, स्पेनची अर्थव्यवस्था व भारतीयांसाठी तेथे असलेल्या संधी या विषयावरील चर्चासत्रे रंगली. माद्रिदमधील प्राडो म्युझीयम, डॉल्फिन शो व माद्रिदचा भव्य राजवाडा पाहुन चकित झालो. माद्रिद फार हरित शहर आहे. येथील वृक्षवल्ली पाहून आपण स्वप्नगरीत फिरत आहोत असा विचार मनात येत होता. जिंदगी न मिलेगी दोबारा या सिनेमामधील पाहिलेले फलॅमेन्को नृत्य पण पाहिले. नाही आवडली फक्त ती माद्रिदमधील बैलांची झुंज. फार ऐकले असल्याने मोठया उत्सुकतेने आम्ही सर्वजण ती पहावयास गेलो. पण तो बैल मारण्याचा प्रकार पाहून मन हेलावले. स्पेनमध्ये बार्सिलोना शहरात या खेळाला बंदी घालण्यात आली आहे. आम्ही कार्यक्रमाला गेलो तेंव्हा सुध्दा तिथे शांत निदर्शने चालू होती. सर्वांनी प्रार्थना केली की हा किळसवाना खेळ बंद होवो. शेवटी प्रसिध्द रिअल माद्रिद स्टेडियमला भेट देऊन दुबई मार्गेमुंबईला येण्यासाठी विमानतळाकडे रवाना झालो.

स्पेनमधून अनेक गोष्टी घेऊन भारतात परतलो तर काही गोष्टी तिथेच ठेवल्या. स्पेनमधील व्यवहारातली स्वच्छता, पारदर्शकता, नीटनेटकेपणा, शिस्त यांचे धडे घेऊन परतलो. त्याची अंमलबजावणी इथे करायची आहे. स्पेनमधील संस्कृती तिथेच ठेवली, आपली संस्कृतीच बरी आहे याची जाणीव झाली.

जाहिरातीसाठी संपर्क
9767114242
9767715300